बहिणाबाई चौधरी यांची गाणी

टंकलेखन:- राहुल प्रकाश सुवर्णा

मुद्रितशोधन:- राहुल प्रकाश सुवर्णा

अनुक्रमणिका

येडीमाय (आदिमाया)

आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी?

बारा गाडे काजळ कुंकू
पुरलं नही लेनं
साती समदूराचं पानी
झालं नहीं न्हानं
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी?

धरतीवरलं चांदी सोनं
डागीन्याची तूट
आभायाचं चोयी लुगडं
तेभी झालं थिटं
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी?

इडा पिडा संकटाले
देल्हा तूने टाया
झाल्या तुझ्या गयामंधी
नरोंडाच्या माया
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी?

बरह्मा इस्नू रूद्र बाळ
खेळईले वटी
कोम्हायता फुटे पान्हा
गानं आलं व्होटी
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी?

नशीबाचे नऊ गिऱ्हे
काय तुझ्या लेखी?
गिऱ्ह्यानाले खाईसनी
कशी झाली सुखी?
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी?

नऊ झनासी खाऊन गेली
सहज एक्या गोष्टी
दहाव्याशी खाशीन तव्हा
कुठे राहिन सुर्ष्टी
आशी कशी येळी वो माये, आशी कशी येळी?

>>>>>>>>>>>>

माझी माय सरसोती

माझी माय सरसोती
        माले शिकवते बोली
लेक बहिनाच्या, मनी
        किती गुपीतं पेरली!

माझ्यासाठी पांडुरंगा
        तुझं गीता – भागवत
पावसात समावतं
        माटीमधी उगवतं!

अरे देवाचं दर्शन
        झालं झालं आपसुक
हिरिदात सूर्यबापा
        दाये अरूपाचं रूप!

तुझ्या पायाची चाहूल
        लागे पानापानांमधी
देवा तुझं येनंजानं
        वारा सांगे कानामधी

फुलामधी समावला
        धरत्रीचा परमय
माझ्या नाकाले इचारा
        नथनीले त्यांच काय?
किती रंगवशी रंग

रंग भरले डोयात
माझ्यासाठी शिरिरंग
रंग खेये आभायात

धर्ती मधल्या रसानं
जीभ माझी सवादते
तव्हा तोंडातली चव
पिंडामधी ठाव घेते.

>>>>>>>>>>>>>

माहेर

बापाजीच्या हायलीत
        येती शेट शेतकरी
दारी खेटराची रास
        घरी भरली कचेरी

गावामधी दबदबा
        बाप महाजन माझा
त्याचा काटेतोल न्याव
        जसा गावामधी राजा

माय भीमाई माऊली
        जशी आंब्याची साऊली
आम्हाईले केलं गार
        सोता उन्हात तावली

तुझे भाऊ देवा घरी
        नही मायबाप तुले
तुले कशाचं माहेर
        लागे कुलूप दाराले

भाऊ ‘घमा’ गाये घाम
        ‘गना’ भगत गनात
‘घना’ माझा लिखनार
        गेला शिक्याले धुयात

आम्ही बहीनी ‘आह्मला’
        ‘सीता, तुयसा, बहीना’
देल्या अशीलाचे घरी
        सगेसाई मोतीदाना

लागे पायाला चटके
        रस्ता तापीसनी लाल
माझ्या माहेराची वाट
        माले वाटे मखमल

जीव व्हतो लाही लाही
        चैत्र वैसागाचं ऊन
पाय पडता ‘लौकीत’
        शीन जातो निंघीसन

तापीवानी नही थडी
        जरी वाहे थोडी थोडी
पानी ‘लौकी’चं नित्तय
        त्याले अम्रीतीची गोडी

माहेरून ये निरोप
        सांगे कानामंधी वारा
माझ्या माहेराच्या खेपा
        ‘लौकी’ नदीले इचारा!

>>>>>>>>>>>>

माहेराची वाट

आज माहेराले जानं
        झाली झाली वो पहाट
आली आली डोयापुढे
        माझ्या माहेराची वाट

रातदीन गजबज
        असं खटल्याचं घर
सदा आबादी आबाद
        माझं ‘आसोद’ माहेर

माझ्या माहेराच्या वाटे
        तांडे पानाचे लागले
पानं कतरतो बारी
        लागे बारीन येच्याले

माझ्या माहेराच्या वाटे
        रेलवाईचें फाटुक
आग्गाडीचं येनंजानं
        तिले कशाची आटक?

माझ्या माहेराच्या वाटे
        ‘लौकी’ लागली लागली
वाटच्या रे वाटसरा
        तुझी तहान भागली

माझ्या माहेराच्या वाटे
        पिव्वी चिकनास खारी
पानी पावसाया आंधी
        जाते धाब्याधाब्यावरी

माझ्या माहेराच्या वाटे
        देखा बाभयींच बन
चुल्हा लहाडीच्यासाठी
        घराघरात बैतन

माझ्या माहेराच्या वाटे
        डाबा पान्याच्या लागल्या
म्हशी बसल्या पान्यात
        जशा वरमाई न्हाल्या

माझ्या माहेराच्या वाटे
        देख मये चारोमेरी
गाडया ऊसाच्या चालल्या
        बुधवारच्या बाजारी

माझ्या माहेराच्या वाटे
        घंटया घुंगराचा नाद
येती जाती बैलगाडया
        धुरकरी घाले साद

मांघे पोत्यातून गये
        गव्हा – जवारीची धार
पाखराचा जमे बेत
        दाने खाई झाले गार

माझ्या माहेराच्या वाटे
गायी म्हशीचं खिल्लार
गावामधी बरकत
दह्या दुधाची रे ढेर!

माझ्या माहेराच्या वाटे
कोन्ही भिकारी – टकारी
आला भीक मांगीसनी
झोयी गेली सम्दी भरी

माझ्या माहेराच्या वाटे
कोन्ही भिलीन बायजा
खाले उतारली पाटी
म्हने कटेलं लेयजा

माझ्या माहेराच्या वाटे
जरी आले पायी फोड
पाय चालले चालले
अशी माहेराची ओढ

माझ्या माहेराच्या वाटे
जरी लागल्या रे ठेचा
वाटवरच्या दगडा
तुले फुटली रे वाचा!

“नीट जाय मायबाई
नको करू धडपड
तुझ्याच मी माहेराच्या

        वाटवरला दगड!”

माझ्या माहेराच्या वाटे
        माले लागली गुचकी
आली उडत उडत
        एक दीसली, सायंकी

माझ्या माहेराच्या वाटे
        मारे सायंकी भरारी
माझ्या जायाच्याच आधी
        सांगे निरोप माहेरी

“ऊठ ऊठ भीमामाय
        काय घरात बसली
कर गुरमय रोटया
        लेक बहिनाई आली!”

>>>>>>>>>>>>

कशाले काय म्हनू नही

बिना कपाशीनं उले
त्याले बोंड म्हनू नही
हरी नामाईना बोले
त्याले तोंड म्हनू नही

नही वाऱ्यानं हाललं
त्याले पान म्हनू नही
नही ऐके हरीनाम
त्याले कान म्हनू नही

पाटा येहेरीवाचून
त्याले मया म्हनू नही
नही देवाचं दर्सन
त्याले डोया म्हनू नही

निजवते भुक्या पोटी
तिले रात म्हनू नही
आखडला दानासाठी
त्याले हात म्हनू नही

ज्याच्यामधी नही पानी
त्याला हाय म्हनू नही
धावा ऐकून आडला
त्याले पाय म्हनू नही

येहेरीतून ये रीती
तिले मोट म्हनू नही

केली सोताची भरती
        त्याले पोट म्हनू नही

नही वळखला कान्हा
        तिले गाय म्हनू नही
जीले नही फुटे पान्हा
        तिले माय म्हनू नही

अरे, वाटच्या दोरीले
        कधी साप म्हनू नही
इके पोटच्या पोरीले
        त्याले बाप म्हनू नही

दुधावर आली बुरी
        तिले साय म्हनू नही
जिची माया गेली सरी
        तिले माय म्हनू नही

इमानाले इसरला
        त्याले नेक म्हनू नही
जल्मदात्याले भोवला
        त्याले लेक म्हनू नही

ज्याच्यामधी नही भाव
        त्याले भक्ती म्हनू नही
ज्याच्यामधी नही चेव
        त्याले शक्ती म्हनू नही

>>>>>>>>>>>>

संसार

अरे, संसार संसार
जसा तावा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर!

अरे, संसार संसार
खोटा कधी म्हनू नही
राऊळाच्या कयसाले
लोटा कधी म्हनू नही

अरे, संसार संसार
नही रडनं कुढनं
येडया, गयातला हार
म्हनू नका रे लोढनं!

अरे, संसार संसार
खीरा येलावऱ्हे तोड
एका तोंडा मधी कडू
बाकी सर्वा लागे गोड

अरे, संसार संसार
म्हनू नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूलं
मधी गोडंब्याचा ठेवा

देखा संसार संसार
    शेंग वरतून काटे
अरे, वरतून काटे
    मधी चिक्ने सागरगोटे!

ऐका, संसार संसार
    दोन्ही जीवाचा इचार
देतो दुःखाले होकार
    अन सुखाले नकार

देखा, संसार संसार
    दोन्ही जीवाचा सुधार
कधी नगद उधार
    सुखादुःखाचा बेपार!

अरे, संसार संसार
    असा मोठा जादूगार
माझ्या जीवाचा मंतर
    त्याच्यावरती मदार

असा संसार संसार
    आधी देवाचा ईसार
माझ्या दैवाचा जोजार
    मग जीवाचा आधार!

>>>>>>>>>>>>

माझ्या जीवा

जीव देवानं धाडला
        जल्म म्हने 'आला आला'
जव्हा आलं बोलावनं
        मौत म्हने 'गेला गेला'

दीस आला कामामधी
        रात नीजमधी गेली
मरनाची नीज जाता
        जलमाची जाग आली

नही सरलं सरलं
        जीवा तुझं येनं जानं
जसा घडला मुक्काम
        त्याले म्हनती रे जीनं

आला सास, गेला सास
        जीवा तुझं रे तंतर
अरे जगनं – मरनं
        एका सासाचं अंतर!

येरे येरे माझ्या जीवा
        काम पडलं अमाप
काम करता करता
        देख देवाजीचं रूप

ऐक ऐक माझ्या जीवा
        पीडायेलाचं कन्हनं?
देरे गांजल्याले हात
        त्याचं ऐक रे म्हननं

अरे निमानतोंडयाच्या
        वढ पाठीवऱ्हे धांडा
नाच नाच माझ्या जीवा
        संसाराचा झालझेंडा

हास, हास माझ्या जीवा
        असा संसारत हास
इडा पीडा संकटाच्या
        तोंडावऱ्हे कायं फास

जग जग माझ्या जीवा
        असं जगनं तोलाचं
उच्च गगनासारखं
        धरत्रीच्या रे मोलाचं

>>>>>>>>>>>>

घरोट (जाते)

देवा, घरोट घरोट
तुझ्या मनातली गोट
सर्व्या दुनियेचं पोट
घरी कर्माचा मरोट

अरे, घरोट घरोट
वानी बाम्हनाचं ‘जात’
कसा घरघर वाजे
त्याले म्हनवा घरोट

अरे जोडता तोडलं
त्याले नातं म्हनू नही
ज्याच्यातून येतं पीठ
त्याले जातं म्हनू नही

कसा घरोट घरोट
माझा वाजे घरघर
घरघरीतून त्याच्या
माले ऐकू येतो सूर

त्यात आहे घरघर
येडया, आपल्या घराची
अरे, आहे घरघर
त्यात भर्ल्या आभायाची!

आता घरोटा घरोटा
दयन मांडलं नीट

अरे, घंटया – भरामधी
        कर त्याचं आता पीठ

चाल घरोटा घरोटा
        तुझी चाले घरघर
तुझ्या घरघरीतून
        पीठ गये भरभर

जशी तुझी रे घरोटा
        पाऊ फिरे गरगर
तसं दुधावानी पीठ
        पडतं रे भुईवर

अरे, घरोटा घरोटा
        घास माझा जवारीचा
तुले सनासुदी गहू
        कधी देते बाजरीचा

माझा घरोट घरोट
        दोन दाढा दोन व्होट
दाने खाये मूठ मूठ
        त्याच्यातून गये पीठ

अरे, घरोटा घरोटा
        माझे दुखता रे हात
तसं संसाराचं गानं
        माझ बसते मी गात

अरे, घरोटा घरोटा
        तुझ्यातून पडे पीठी
तसं तसं माझं गानं
        पोटातून येतं व्होटी

दाने दयता दयता
        जशी घामानं मी भिजे
तुझी घरोटा घरोटा
        तशी पाऊ तुझी झिजे

झिजिसनी झिजिसनी
        झाला संगमरवरी
अरे, तुला टाकलाये
        टकारीन आली दारी!

>>>>>>>>>>>>

मन

मन वढाय वढाय
        उभ्या पीकातलं ढोर
किती हाकला हाकला
        फिरी येतं पिकांवर

मन मोकाट मोकाट
        त्याले ठायी ठायी वाटा
जशा वाऱ्यानं चालल्या
        पान्यावऱ्हल्यारे लाटा

मन लहरी लहरी
        त्याले हाती धरे कोन?
उंडारलं उंडारलं
        जसं वारा वाहादन

मन जह्यरी जह्यरी
        याचं न्यारं रे तंतर
अरे, इचू, साप बरा
        त्याले उतारे मंतर!

मन पाखरू पाखरू
        त्याची काय सांगू मात?
आता व्हतं भुईवर
        गेलं गेलं आभायात

मन चप्पय चप्पय
	त्याले नही जरा धीर
तठे व्हयीसनी ईज
	आलं आलं धर्तीवर

मन एवढं एवढं
	जसा खाकसचा दाना
मन केवढं केवढं?
	आभायात बी मायेना

देवा, कसं देलं मन
	आसं नही दुनियात
आसा कसा रे तू योगी
	काय तुझी करामत!

देवा आसं कसं मन?
	आसं कसं रे घडलं
कुठे जागेपनी तूले
	असं सपन पडलं!

>>>>>>>>>>>>

हिरीताचं देनं घेनं

नको लागू जीवा, सदा मतलबापाठी
हिरीताचं देनं घेनं नही पोटासाठी

उभे शेतामधी पिकं
ऊन वारा खात खात
तरसती ‘कव्हा जाऊ
देवा, भुकेल्या पोटात’

पेटवा रे चुल्हा आता, मांडा ताटवाटी
नको लागू जीवा, सदा मतलबापाठी

पाहीसनी रे लोकाचे
यवहार खोटे नाटे
तव्हा बोरी बाभयीच्या
आले अंगावर काटे

राखोयीच्यासाठी झाल्या शेताले कपाटी
नको लागू जीवा, सदा मतलबापाठी

किती भरला कनगा
भरल्यानं होतो रिता
हिरीताचं देनं घेनं
नही डाडोराकरता

गेली देही निंघीसनी नाव रे शेवटी
नको लागू जीवा, सदा मतलबापाठी

>>>>>>>>>>>>

लपे करमाची रेखा

लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खाली
पुशीसनी गेलं कुंकू
रेखा उघडी पडली

देवा, तुझ्याबी घरचा
झरा धनाचा आटला
धन – रेखाच्या चऱ्यानं
तयहात रे फाटला

बापा, नको मारू थापा
असो खऱ्या असो खोटया
नही नशीब नशीब
तयहाताच्या रेघोटया!

अरे, नशीब नशीब
लागे चक्कर पायाले
नशिबाचे नऊ गिऱ्हे
ते भी फिरत राह्यले!

राहो दोन लाल सुखी
हेच देवाले मांगनं
त्यात आलं रे नशीब
काय सांगे पंचागन!

नको नको रे जोतिषा,

        नको हात माझा पाहू

माझं दैव माले कये

        माझ्या दारी नको येऊ!

>>>>>>>>>>>>>

आता माझा माले जीव

अरे रडता रडता
        डोये भरले भरले
आसू सरले सरले
        आता हुंदके उरले!

आसू सरले सरले
        माला मलेच इसावा
आस आसवा बिगर
        रडू नको माझ्या जीवा!

सांग सांग धर्ती माता
        अशी कशी जादू झाली
झाड गेलं निंधीसनी
        मांघे सावली उरली

देव गेले देवाघरी
        आठी ठेयीसनी ठेवा
डोयापुढे दोन लाल
        रडू नको माझ्या जीवा!

रडू नको माझ्या जीवा
        तुला रडयाची रे सव
रडू हासव रे जरा
        त्यात संसाराची चव!

कुंकू पुसलं पुसलं
        आता उरलं गोंधन
तेच देइन देइन
        नशिबाले आवतन

जरी फूटल्या बांगडया
        मनगटी करतूत
तुटे मंगयसूतर
        उरे गयाची शपत

नका नका आयाबाया
        नका करू माझी कीव
झालं माझं समाधान
        आता माझा माले जीव

>>>>>>>>>>>>

वाटच्या वाटसरा

वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी
नशीबी दगड गोटे
        काटयाकुटयाचा धनी
पायाले लागे ठेचा
        आलं डोयाले पानी

वरून तापे ऊन
        आंग झालं रे लाही
चालला आढवानी
        फोड आले रे पायी

जानच पडीन रे
        तुले लोकाच्यासाठी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी!
        दिवस ढयला रे

        पाय उचल झट
असो नसो रे तठी
        तुझ्या लाभाची गोट

उतार चढनीच्या
        दोन्हि सुखादुखात
रमव तुझा जीव
        धीर धर मनात
उघडू नको आता
        तुझ्या झाकल्या मुठी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी!

‘माझेज भाऊबंद
        घाईसनी येतीन!’
नको धरू रे आशा
        धर एव्हढं ध्यान

तुझ्या पायाने जानं
        तुझा तुलेच जीव
लावनी पार आता
        तुझी तुलेच नाव

मतलबाचे धनी
        सर्वी माया रे खोटी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी!
वाऱ्याचं वाहादन
        आलं आलं रे मोठं
त्याच्यात झुकीसनी
        चुकू नको रे वाट
दोन्ही बाजूनं दऱ्या
        धर झुडूप हाती
सोडू नको रे धीर
        येवो संकट किती
येऊ दे परचीती
        काय तुझ्या ललाटी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी!

>>>>>>>>>>>>

शेतीची साधने

सरत सरत
        करे पेरत पेरत

मोघडा मोघडा
        पेरनीचा चवघडा

पांभर पांभर
        मांघे धारये झांबर

कोयप कोयप
        निंदाईले सोप सोप

आऊत आऊत
        आला कमाईले ऊत

तीफन तीफन
        व्हये शेताचं मापन

चाहूर चाहूर
        आता सरलं काहूर

वखर वखर
        घाले मायेची पाखर

नागर नागर
        सर्व्या सुखाचं आगर

>>>>>>>>>>>>

आला पाऊस

आला पह्यला पाऊस
        शिपडली भुई सारी
धरत्रीचा परमय
        माझं मन गेलं भरी

आला पाऊस पाऊस
        आता सरीवर सरी
शेतं शिवारं भिजले
        नदी नाले गेले भरी

आला पाऊस पाऊस
        आता धूमधडाख्यानं
घर लागले गयाले
        खारी गेली वाहीसन

आला पाऊस पाऊस
        ललकारी रे ठोकत
पोरं निंघाले भिजत
        दारी चिल्लाया मारत

आला पाऊस पाऊस
        गडगडाट करत
धडधड करे छाती
        पोरं दडाले घरात

आता उगू दे रे शेतं
        आला पाऊस पाऊस

वऱ्हे येऊ दे रे रोपं
        आता फिटली हाऊस

येता पाऊस पाऊस
        पावसाची लागे झडी
आता खा रे वडे भजे
        घरांमधी बुसा दडी

देवा, पाऊस पाऊस
        तुझ्या डोयातले आंस
दैवा, तुझा रे हारास
        जीवा, तुझी रे मिरास

>>>>>>>>>>>>

पेरनी

पेरनी पेरनी
आले पावसाचे वारे
बोलला पोपया
पेर्ते व्हा रे पेर्ते व्हा रे!

पेरनी पेरनी
आले आभायात ढग
ढगात बाजंदी
ईज करे झगमग

पेरनी पेरनी
आभायात गडगड
बरस बरस
माझ्या उरी धडधड

पेरनी पेरनी
काढा पांभरी मोघडा
झडीन तो झडी
कव्हा बर्साती चौघडा

पेरनी पेरनी
आला धरतीचा वास
वाढे पेरनीची
शेतकऱ्या, तुझी आस

पेरनी पेरनी
        आता मिरूग बी सरे
बोलेना पोपया
        पेर्ते व्हारे पेर्ते व्हारे!

पेरनी पेरनी
        भीज भीज धर्ती माते
बीय बियान्याचे
        भरून ठेवले पोते

पेरनी पेरनी
        अवघ्या जगाच्या कारनी
ढोराची चारनी
        कोटी पोटाची भरनी

पेरनी पेरनी
        देवा, तुझी रे करनी
दैवाची हेरनी
        माझ्या जीवाची झुरनी

>>>>>>>>>>>>

देव अजब गारोडी

धरत्रीच्या कुशीमधी
        बीयबियानं निजली
वऱ्हे पसरली माटी
        जशी शाल पांघरली

बीय टरारे भुईत
        सर्वे कोंब आले वऱ्हे
गह्यरलं शेत जसं
        आंगावरती शहारे

ऊन वाऱ्याशी खेयता
        एका एका कोंबातून
पर्गटले दोन पानं
        जसे हात जोडीसन

टाया वाजवती पानं
        दंग देवाच्या भजनी
जसे करती कारोन्या
        होऊ दे रे आबादानी

दिसामासा व्हये वाढ
        रोप झाली आता मोठी
आला पिकाले बहार
        झाली शेतामधी दाटी

कसे वाऱ्यानं डोलती
        दाने अले गाडी गाडी
दैव गेलं रे उघडी
        देव अजब गारोडी!

>>>>>>>>>>>>>

कापनी

आता लागे मार्गेसर
        आली कापनी कापनी
आज करे खालेवऱ्हे
        डाव्या डोयाची पापनी!

पडे जमीनीले तढे
        आली कापनी कापनी
तशी माझ्या डोयापुढे
        उभी दान्याची मापनी

शेत पिवये धम्मक
        आली कापनी कापनी
आता धरा रे हिंमत
        इय्ये ठेवा पाजवुनी

पिंक पिवये पिवये
        आली कापनी कापनी
हातामधी धरा इय्ये
        खाले ठेवा रे गोफनी

काप काप माझ्या इय्या,
        आली कापनी कापनी
थाप लागली पीकाची
        आली डोयाले झापनी!

आली पुढे रगडनी
        आता कापनी कापनी
खये करा रे तय्यार
        हाती घीसन चोपनी

माझी कापनी कापनी
        देवा तुझी रे मापनी
माझ्या दैवाची करनी
        माझ्या जीवाची भरनी

>>>>>>>>>>>>>

रगडनी

केला पीकाचा रे साठा
        जपीसन सर्व्याआधी
शेता शिवाराचं धन
        आता आलं खयामधी

खय झालं रे तैयार
        सम्दी भुई सारवली
मधी उभारलं मेढं
        पात बैलाची चालली

आता चाल चाल बैला,
        आता चाल भिरभिरा
व्हऊ दे रे कनूसाचा
        तुझ्या खुराखाले चुरा

पाय उचल रे बैला,
        कर बापा आता घाई
चालू दे रे रगडनं
        तुझ्या पायाची पुन्याई?

पाय उचल रे बैला,
        कनूसाचा कर भूसा
दाने एका एकातून
        पडतील पसा पसा

आता चाल चाल बैला,
पुढे आली उपननी
वारा चालला रे वाया,
कसा ठेवू मी धरूनी

आता सोडी देल्ही पात
बैलं गेले चाऱ्यावरी
डोयापुढे उपननी
जीव माझा वाऱ्यावरी

रगडनी रगडनी
देवा, तुझी रे घडनी
दैवा तुझी झगडनी
माझी डोये उघडनी!

>>>>>>>>>>>>>

उपननी

उपननी उपननी
आता घ्या रे पाटया हाती
राहा आता उपन्याले
उभे तिव्हारीवरती

चल ये रे ये रे वाऱ्या,
ये रे मारोतीच्या बापा
नको देऊ रे गुंगारा
पुऱ्या झाल्या तुझ्या थापा!

नही अझून चाहूल
नको पाहू रे घोरात
आज निंघाली कोनाची
वाऱ्यावरती वरात?

ये रे वाऱ्या घोंगावत
ये रे खयाकडे आधी
आज कुठे रे शिरला
वासराच्या कानामध्यी!

भिनभिन आला वारा
कोन कोनाशी बोलली?
मन माझं हारखलं
पानं झाडाची हालली!

वारा आलारे झन्नाटया

झाडं झुडपं डोलली
धरा मदनाच्या पाटया
खाले पोखरी चालली

देवा, माझी उपननी
तुझ्या पायी इनवनी
दैवा, तुझी सोपवनी
माझ्या जीवाची कारोनी

>>>>>>>>>>>>

मोट हाकलतो एक

येहेरीत दोन मोटा
दोन्हीमधी पानी एक
आडोयले कना, चाक
दोन्हीमधी गती एक

दोन्ही नाडा – समदूर
दोन्हीमधी झीज एक
दोन्ही बैलाचं ओढणं
दोन्हीमधी ओढ एक

उतरनी – चढनीचे
नाव दोन धाव एक
मोट हाकलतो एक
जीव पोसतो कितीक?

>>>>>>>>>>>>

खोप्यामधी खोपा

अरे खोप्यामधी खोपा
        सुगरनीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
        झोका झाडाले टांगला

पिलं निजली खोप्यात
        जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
        जीव झाडाले टांगला!

सुगरीन सुगरीन
        अशी माझी रे चतुर
तिले जल्माचा संगाती
        मिये गन्यागंप्या नर

खोपा इनला इनला
        जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
        जरा देख रे मानसा!

तिची उलूशीच चोच
        तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं
        दोन हात दहा बोटं?

>>>>>>>>>>>>

गाडी जोडी

माझ्या लाल बैलायची जोडी रे
कशी गडगड चाले गाडी
एक रंगी एकज शिंगी
एकज चनका यांचे अंगी

दिसे डौलदार ते खांदे रे
तसे सरीलाचे बांधे
माझ्या बैलायची चालनी रे
जशी चप्पय हरनावानी

माझ्या बैलायची ताकद रे
साखयदंडाले माहित
दमदार बैलाची जोडी रे
तिले साजे गुंढयगाडी

कशि गडगड चाले गाडी रे
माझी लाल बैलायची जोडी
कसे टन् टन् करती चाकं रे
त्याले पोलादाचा आंख

सोभे वरती रंगित खादी रे
मधी मसूऱ्याची गादी
वऱ्हे रेसमाचे गोंडे रे
तिचे तीवसाचे दांडे

बैल हुर्पाटले दोन्ही रे
　　चाकं फिरती भिंगरीवानी
मारे ललकारी धुर्करी ना –
　　लागे पुन्हानं ना आरी

अशी माझी गुंढ्यगाडी रे
　　तिले लाल बैलायची जोडी

>>>>>>>>>>>>>

गुढी उभारनी

गुढीपाडव्याचा सन
	आता उभारा रे गुढी
नव्या वरसाचं देनं
	सोडा मनातली आढी

गेलं साली गेली आढी
	आता पाडवा पाडवा
तुम्ही येरांयेरांवरी
	लोभ वाढवा वाढवा

अरे, उठा झाडा आंग
	गुढीपाडव्याचा सन
आता आंगन झाडूनी
	गेली राधी महारीन

कसे पडले घोरत
	असे निस्सयेलावानी
हां हां म्हनता गेला रे
	रामपहार निंघूनी

आता पोथारा रे घर
	सुधारा रे पडझडी
करीसन सारवन
	दारी उभारा रे गुढी

चैत्राच्या या उन्हामधी
	जीव व्हये कासाईस

रामनाम घ्या रे आता
        रामनवमीचा दीस

पडी जातो तो ‘पाडवा’
        करा माझी सुधारनी
आता गुढीपाडव्याले
        म्हना ‘गुढी उभारनी’

काय लोकाचीबी तऱ्हा
        कसे भांग घोटा पेल्हे
उभा जमीनीच्या मधी
        आड म्हनती उभ्याले

आसं म्हनू नही कधी
        जसं उभ्याले आडवा
गुढी उभारतो त्याले
        कसं म्हनती पाडवा?

>>>>>>>>>>>>

आखजी

आखजीचा आखजीचा
        मोलाचा सन देखा जी
निंबावरी निंबावरी
        बांधला छान झोका जी

माझा झोका माझा झोका
        चालला भिरभिरी जी
माझा झोका माझा झोका
        खेयतो वाऱ्यावरी जी

गेला झोका गेला झोका
        चालला माहेराले जी
आला झोका आला झोका
        पलट सासराले जी

माझा झोका माझा झोका
        जीवाची भूक सरे जी
भूक सरे भूक सरे
        वाऱ्यानं पोट भरे जी

आला वारा आला वारा
        वाऱ्यानं जीव झुले जी
जीव झुले जीव झुले
        झाडाची डांग हाले जी

डांग हाले डांग हाले
        नजर नहीं ठरे जी

झाली आता झाली आता
        धरती खालेवऱ्हे जी

आंगनात आंगनात
        खेयती पोरीसोरी जी
झाल्या दंग झाल्या दंग
        गाऊनी नानापरी जी

झाला सुरू झाला सुरू
        पहिला माझा पिंगा जी
फुगड्यांचा फुगड्यांचा
        चालला धांगडधिंगा जी

दारोदारी दारोदारी
        खेयाची एक घाई जी
घरोघरी घरोघरी
        मांडल्या गवराई जी

गवराई गवराई
        सजव सजवल्या जी
संगातीनी संगातीनी
        बोलव बोलवल्या जी

बोलवल्या बोलवल्या
        टिपऱ्या झाल्या सुरू जी
टिपऱ्याचे टिपऱ्याचे
        नादवले घुंगरू जी

किती खेय किती खेय
सांगू मी काय काय जी
खेयीसनी खेयीसनी
आंबले हातपाय जी

चार दीस चार दीस
इसावल्या घरात जी
आहे पुढे आहे पुढे –
शेतीची मशागत जी

सन सारे आस उरे
आखजी गेली व्हयी जी
सांग सई सांग सई,
आखजी आता कही जी?

>>>>>>>>>>>>

सासुरवाशीन

उठ सासुरवाशिन बाई
उठ मघ्घम राती मांड दयन तू नीट
अन् चालव बाई घरोट

उठ सासुरवाशिन बाई
उठ राम पहारी डोईवर घे घडा
उठ बांग फुके कोंबडा

उठ सासुरवाशिन बाई
उठ सयपाकाले पेटव पेटव चुल्हा
वर सूर्यबापा आला

उठ सासुरवाशिन बाई
उठ जानं शेती कामाचा किति घोर
तू गोठयामधलं ढोर

उठ सासुरवाशिन बाई
सुरू झाली वटवट कातवली वो सासू
पुस डोयांमधले आसू

उठ सासुरवाशिन बाई
घे सोशीसन घे घालू नको वो वाद
कर माहेराची याद

>>>>>>>>>>>>

योगी आणि सासुरवाशीन

योगी:-

बसला मी देवध्यानी
        काय मधी हे संकट
बाई, बंद कर तुझ्या
        तोंडातली वटवट!

माझं माहेर, माहेर
        सदा गानं तुझ्या ओठी
मंग माहेरून आली
        सासराले कशासाठी?

सासुरवाशीण:-

अरे लागले डोहाये
        सांगे शेतातली माटी
गाते माहेराचं गानं
        लेक येईन रे पोटी!

देरे देरे योग्या ध्यान
        ऐक काय मी सांगते
लेकीच्या माहेरासाठी
        माय सासरी नांदते

देव कुठे देव कुठे
        भरीसनी जो उरला
अरे उरीसनी माझ्या
        माहेरात सामावला

पोया

आला आला शेतकऱ्या
        पोयाचा रे सन मोठा
हाती घेईसन वाट्या
        आता शेंदूराले घोटा

आता बांधा रे तोरनं
        सजवा रे घरदार
करा आंघोयी बैलाच्या
        लावा शिंगाले शेंदूर

लावा शेंदूर शिंगाले
        शेंव्या घुंगराच्या लावा
गयामधी बांधा जीला
        घंटया घुंगरू मिरवा

बांधा कवड्याचा गेठा
        आंगावऱ्हे झूल छान
माथा रेसमाचे गोंडे
        चारी पायात पैंजन

उठा उठा बह्यनाई,
        चुले पेटवा पेटवा
आज बैलाले नीवद
        पुरनाच्या पोया ठेवा

वढे नागर वखर
        नही कष्टाले गनती

पीक शेतकऱ्या हाती
        याच्या जीवावर शेती!

उभे कामाचे ढिगारे
        बैल कामदार बंदा
याले कहीनाथे झूल
        दानाचाऱ्याचाज मिंधा

चुल्हा पेटवा पेटवा
        उठा उठा आयाबाया
आज बैलाले खुराक
        रांधा पुरनाच्या पोया

खाऊ द्या रे पोटभरी
        होऊ द्यारे मगदूल
बशीसनी यायभरी
        आज करू द्या बागूल

आता ऐका मनातलं
        माझं येळीचं सांगनं
आज पोयाच्या सनाले
        माझं येवढं मांगनं

कसे बैल कुदाळता
        आदाबादीची आवड
वझं शिंगाले बांधता
        बाशिंगाचं होईजड

नका हेंडालू बैलाले
माझं ऐका रे जरासं
व्हते आपली हाऊस
आन बैलाले तरास

आज पुंजा रे बैलाले
फेडा उपकाराचं देनं
बैला, खरा तुझा सन
शेतकऱ्या तुझं रीन!

>>>>>>>>>>>>>

अनागोंदी कारभार

भुजे सोनार मडकं
        कुभारानं केले तोडे
बंडी शिवतो सुतार
        शिंपी लाकडाले घडे

शिये लव्हार वहाना
        इय्या चांभार घडतो
चाले महाराची पोथी
        ढोरं बाम्हन वढतो

बेलदार करे पेढे
        हलवाई खुंदे गारा
पिंजे पाथरट रूई
        पिंजरीन घडे चिरा

काय कामाची वाटनी
        झाला गावाचा खैमाना
अरे असा कसा गाव
        त्याले ठाव ना ठिकाना!

>>>>>>>>>>>>>

नही दियामधी तेल

नही दियामधी तेल
        कशी आंधारली रात
तेल मिये एकदाच
        नेली उंदरानं वात!

वात केली चींधुकाची
        तेल दियात पडलं
सापडेना आकपेटी
        घोडं आठी बी आडलं

सापडली आकपेटी
        आग्यायेतायाची लेक
आली आली हातीकाडी
        लाडानवसाची एक

शिलगावली रे काडी
        जोत पेटली पेटली
आंधाऱ्याने ब्याहीसनी
        मेली इझीसनी गेली

\>>>>>>>>>>>>

काय घडे आवगत

उचलला हारा
        हारखलं मन भारी
निजला हाऱ्यात
        तान्हा माझा शिरीहारी

डोक्यावर हारा
        वाट मयाची धरली
भंवयाचा मया
        आंब्याखाले उतरली

उतारला हारा
        हालकलं माझं मन
निजला हाऱ्यात
        माझा तानका ‘सोपान’

लागली कामाले
        उसामधी धरे बारे
उसाच्या पानाचे
        हातीपायी लागे चरे

ऐक ये आरायी
        ‘धावा धावा घात झाला
अरे, धावा लव्हकरी
        आंब्याखाले नाग आला!’

तठे धावत धावत
        आली उभी धाववर
काय घडे आवगत
        कायजात चरचर!

फना उभारत नाग
        व्हता त्याच्यामधी दंग
हारा उपडा पाडूनी
        तान्हं खेये नागासंग

“हात जोडते नागोबा
        माझं वाचव रे तान्हं
अरे, नको देऊ डंख
        तुले शंकराची आन

आता वाजव वाजव
        बालकिस्ना तुझा पोवा
सांग सांग नागोबाले
        माझा आयक रे धावा”

तेवढ्यात नाल्याकडे
        ढोरक्याचा पोवा वाजे
त्याच्या सूराच्या रोखानं
        नाग केला वजेवजे

तव्हा आली आंब्याखाले
        उचललं तानक्याले
फुकीसनी दोन्ही कान
        मुके कितीक घेतले

देव माझा रे नागोबा
        नही तान्ह्याले चावला
सोता व्हयीसनी तान्हा
        माझ्या तान्ह्याशी खेयला

कधी भेटशीन तव्हा
        व्हतील रे भेटीगाठी
येत्या नागपंचमीले
        आणीन दुधाची वाटी.

>>>>>>>>>>>>

देव दिसला, देव कुठे?

सदा जगाच्या कारनी
चंदनापरी घसला
अरे सोतामधी त्याले
देव दिसला दिसला!

सोता झाला रे दगड
घाव टाकीचा सोसला
अरे दगडात त्याले
देव दिसला दिसला!

डोये मीटले मीटले
सोतालेबी इसरला
अरे आंधाऱ्यात त्याले
देव दिसला दिसला!

माले कयालं गुपित
काय तुझी करामत
अरे आंधारानं केली
उजेडाच्या वऱ्हे मात!

देव कुठे देव कुठे?
तुझ्या बुबुयामझार
देव कुठे देव कुठे?
आभायाच्या आरपार!

>>>>>>>>>>>>

मानूस

मानूस मानूस
मतलबी रे मानसा,
तुले फार हाव
तुझी हाकाकेल आशा

मानसा मानसा,
तुझी नियत बेकार
तुझ्याहून बरं
गोठ्यातलं जनावर

भरला डाडोर
भूलीसनी जातो सूद
खाईसनी चारा
गायम्हैस देते दूध

मतलबासाठी
मान मानूस डोलये
इमानाच्यासाठी
कुत्रा शेपूट हालये

मानसा मानसा,
कधी व्हशीन मानूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानूस!

>>>>>>>>>>>>

रायरंग

आला आला रायरंग
        करे लोकाचं रंजन
हासवता हासवता
        घाले डोयात अंजन

आला आला रायरंग
        देखा याची सपातनी
भरे हिरीद काठोट
        झरे डोयाची माथनी

रायरंग रे नाटक्या
        याच्या पोटाचं गऱ्हान
नका म्हनू रे गऱ्हान
        घडे देवाचं पुरान

कोन्ही म्हणे आलं दारी
        रायरंगाचं रे सोंग
अरे त्याच सोंगामधी
        माले दिसे पांडुरंग!

आला रायरंग दारी
        याचं फेडा तरी रीन
अरे थकले भागले
        त्याचा घालवतो शीन

नका म्हणू रे भिकारी
        जरी तुम्ही नानावटी
करा गुनाची कदर
        हात घाला कनवटी

>>>>>>>>>>>>

पिलोक

पिलोक पिलोक
आल्या पिलोकाच्या गाठी
उजाडलं गाव
खया – मयांमधी भेटी

पिलोक पिलोक
जीव आला मेटाकुटी
भाईर झोपडया
गावामधी मसनवाटी

पिलोक पिलोक
कशाच्या रे भेटीगाठी!
घरोघरी दूख
काखाजागामधी गाठी

पिलोक पिलोक
आता नशीबात ताटी
उचलला रोगी
अन् गाठली करंटी

>>>>>>>>>>>>

चुल्हा पेटता पेटेना!

घरी दाटला धुक्कय
        कसा हटता हाटेना
माझे डोये झाले लाल
        चुल्हा पेटता पेतेना

कसा पेटता पेटेना
        चुल्हा किती फुका फुका
लागल्या रे घरांमधी
        अवघ्याले भुका भुका

आता सापडेना हाती
        कुठे फूकनी बी मेली
कुठे पट्टवकरीन –
        'नूरी' पयीसन गेली

आता गेल्या सरीसनी
        पेटीमधल्या आक्काड्या
सर्व्या गेल्या बयीसनी
        घरामधल्या संकाड्या

पेट पेट धुक्कायेला,
        किती घेसी माझा जीव
आरे इस्तवाच्या धन्या!
        कसं आलं तुले हीव!

तशी खाबांशी फूकनी

        सापडली सापडली
फुकी – फुकीसनी आग
        पाखडली पाखडली!

आरे फूकनी फूकता
        इस्तो वाजे तडतड
तव्हा धगला धगला
        चुल्हा कसा धडधड

मंग ठाकला ऊसासा
        थोडा घेतला इसावा
एकदाचा आदयला
        झट चुल्ह्यावर तावा

आता रांधते भाकर
        चुल्ह्यावर ताजी ताजी
मांघे शिजे वजेवजे
        भांग चुल्हीवर भाजी

खूप रांधल्या भाकरी
        दुल्ळी गेली भरीसनी
मंग हात धोईसनी
        इस्त्यावर पडे पानी

इस्त्यावर पडे पानी
        आली वाफ हात लासे
तव्हा उचलता तावा
        खसा खदखदा हासे!

मी कोन?

अरे मी कोन, मी कोन?
        आला मानसाले ताठा
सर्व्या दुनियात आहे
        माझ्याहून कोन मोठा?

अरे मी कोन, मी कोन?
        बोले भुकेलं मीपन
तव्हा तोंडातला घास
        म्हने, “तू कोन, तू कोन?”

अरे मी कोन, मी कोन?
        जव्हा लागली तहान
तव्हा पान्याचा घुटका
        म्हने, “तू कोन, तू कोन?”

अरे मी कोन, मी कोन?
        लागे ठसका जोरानं
तव्हा घशातला सास
        म्हने, “तू कोन, तू कोन?”

अरे मी कोन, मी कोन?
        माझ्या मुखी हरिनाम!
“तुझ्या जिभेले इचार”
        मधी बोले आत्माराम

सर्व्या दुनियाचा राजा
        म्हने, “तू कोन, तू कोन?”
अशा त्याच्या मीपनाले
        मसनात सिव्हासन!

अरे मी कोन, मी कोन?
        मीपनाची मरीमाय
देखा इची कशी तऱ्हा
        सोता सोतालेच खाय!

>>>>>>>>>>>>>

खरा देवामधी देव

अरे कानोड कानोड
        सदा रूसते फुगते
आंगावरती लेयाले
        सर्वे डागीने मांगते

अरे डागिने मांगते
        हिची हौस फिटेनाज
अशी कशी नितातेल
        तिले गान गाती रोज

माय कानोड कानोड
        मानसाची जमे थाप
देखा वाजयी वाजयी
        सर्वे फुटले रे डफ

अरे पाह्या जरा पुढे
        आली पंढरीची हुडी
पाहीसन झाली कशी
        तुझी कानोड कानोडी!

मापा कानोड कानोड
        काय देवाचं रे सोंग!
खरा देवामधी देव
        पंढरीचा पांडुरंग!

अरे, एकनाथासाठी
        कसा चंदन घासतो
सावत्याच्या बरोबर
        खुर्प हातात धरतो

बोधाल्याच्या शेतामधी
        दाने देतो खंडी खंडी
झाला इठोबा महार
        भरे दामाजीची हुंडी

कबीराच्या साठी कसा
        शेले इने झटपट
जनाबाई बरोबर
        देव चालये घरोट

कुठे तुझी रे कानोड
        कुठे माझा रे इठोबा
कुठे निंबाची निंबोयी
        कुठे 'बोरशाचा' आंबा

अरे इठोबा सारखं
        देवदेवतं एकज
चला घ्या रे दरसन
        निंघा पंढरीले आज!

>>>>>>>>>>>>

विठ्ठल मंदिर

माझं इठ्ठल मंदीर
        अवघ्याचं माहेर
मधि इठ्ठल – रखूमाई
        उभे इटेवर

टाय वाजे खनखन
        मुरदुंगाची धून
तठे चाललं भजन
        गह्यारी गह्यारीसन

टायकऱ्याचा जमाव
        दंगला दंगला
तुकारामाचा अभंग
        रंगला रंगला

तुम्ही करा रे भजन
        ऐका रे कीर्तन
नका होऊ रे राकेस
        सुध्द ठेवा मन

आता सरला अभंग
        चालली पावली
'जे जे इठ्ठल रखुमाई
        ईठाई माऊली'

शेतांमधी गये घाम
        हाडं मोडीसनी
आता घ्या रे हरी नाम
        टाया पीटीसनी

उभा भक्तीचा हा झेंडा
        हरीच्या नावानं
हा झेंडा फडकावला
        ‘झेंडूला बोवानं”

आता झाली परदक्षीना
        भूईले वंदन
‘हेचि दान देगा देवा’
        आवरलं भजन

आता फिरली आरती
        भजन गेलं सरी
‘बह्यना’ देवाचीया दारी
        उभी क्षनभरी

>>>>>>>>>>>>

घरापासून मळ्याकडे

१

देखा महारवाडयात
नावाचेच घरदारं
भटकती गावामधी
चाले तोंडानं जोहार

देखा महारवाडयात
कशी मानसाची दैना
पोटामधी उठे आग
चुल्हा पेटता पेटेना!

महारकी महारकी
गावकरी ठेंकेदार
गावातल्या पाटलाचे
हुकुमाचे ताबेदार!

२

आता चाला जरा पुढे
भट्टी दारूची लागली
तठी भंगड दुनिया
जिती आशीसनी मेली

सदू गेली रे दवडी
बेसूदाची चाले गीता
नही हातात कवडी
तोंडी हजाराच्या बाता!

काम करीसनी भागे
        संकटानं गांजे कोनी
दुख इसऱ्याच्या साठी
        करती रे नशापानी

पैशापरी जाये पैसा
        भूतामधी झाले जमा
दारू पीसनी पीसनी
        झाल्या तोंडाच्या चिलमा

३

अरे नारखा वाड्यात
        देवा, पडता रे पाय
दाबा दाबा नाकपुड्या
        आता नही दुजी सोय!

किती बदकं – कोंबड्या
        आठीतठी घनानल्या
दारोदारी पडे घान
        घरी माख्या भनानल्या!

४

चुनीलाल बापू नांदे
        राम मंदिराच्या नेटे
त्याच्या वाट्याले रे दाम
        आप्पाजीले राम भेटे

चुनी बापूची रे पेढी
        तठी चाले छ्नन छ्नन

राम मंदीरामधी रे
        रामनामाचं भजन

        ५

मंमई बाजारवाटे
        चाले धडाड – दनाना
असा जयगावामधी
        नानाजीचा छापखाना

नानाजीचा छापखाना
        त्यात मोठे मोठे पुठ्ठे
तसे शाईचे दराम
        आन कागदाचे गठ्ठे

किती शिशाच्या चमटया
        ठसे काढले त्यावर
कसे निंघती कागद
        छापसनी भराभर

चाले ‘छाप्याचं यंतर’
        जीव आठे बी रमतो
टाकीसनी रे मंतर
        जसा भगत घुमतो!

मानसापरी मानूस
        राहतो रे येडजाना
अरे होतो छापीसनी
        कोरा कागद शहाना

६

आता पाह्य जरा पुढे
        लागे भूताची हायली
तीले नक्षीचं लाकूड
        कोन्ह कशाले बांधली!

काय बांध्याचा उपेग
        नही मानूस घरात
यायभरी रातभरी
        त्यात नाचती रे भूतं!

भूईमंधी रे डबोलं
        डोई पापाचं टोपलं
अरे मानसाचं भूत
        मानसानं रे घडलं!

७

आलं भाटीनीचं घर
        तान्हा माझा रे हाटला
झेप टाकली टाकली
        तिनं उचली घेतला

“खेय खेय यायभरी
        भाटीनीची भारी माया
खाय आता भुसकुट
        पेपरमीटाच्या गोया.”

८

सोन्यारूपानं मढला
मारवाड्याचा बालाजी
शेतकऱ्याचा इठोबा
पानाफुलामधी राजी

अरे बालाजी – इठोबा
दोन्ही एकज रे देव
सम्रीतीनं गरीबानं
केला केला दुजाभाव

९

देखा रंगीत हायली
हांड्या झुंबर ते किती
मखरात बसवला
मोऱ्याबापा गनपती

१०

सनी देवा सनी देवा
तुले माझा दंडवत
फेऱ्या घालते मी बापा
नको पाडू रे फेऱ्यात

सनीबापा, सनीबापा
घे रे तेलाचं बुधलं
तुले तेलात न्हानते
नको काढू माझं तेल

११

दायवाल्याच्या फडात
तुरी हर्बऱ्याची थाप
दाय भरड भरड
झालं झालं सुरू माप

दायवाल्याच्या फडात
जसं पिकलं रे सोनं
दाय पिवयी धम्मक
भरीसनी गेलं मन

घरी भरल्या तिजोऱ्या
दारी दायीचे रे हुडे
कानी घातल्या रे साक्या
हाती सोनियाचे कडे

>>>>>>>>>>>>

गोसाई

तठे बसला गोसाई
धुनी पेटयी शेतात
करे ‘बं बं भोलानाथ’
धरे चिमटा हातात

मोठा गोसाई यवगी
त्याच्यापाशी रे इलम
राहे रानात एकटा
बसे ओढत चिलम!

अरे, गोसायाच्यापाशी
जड्याबुट्या व्हत्या फार
देये लोकाले औसद
रोग पयी जाये पार!

अशा औसदाच्यासाठी
येती लोकांच्या झुंबडी
पन कोन्हाबी पासून
कधी घेयेना कवडी

चार झाडाले बांधल्या
व्हत्या त्याच्या चार गाई
पेये गाईचंच दूध
पोटामधी दूज नही

एक व्हती रे ढवयी
एक व्हती रे कपीली

एक व्हती रे काबरी
        आन एक व्हती लाली

सर्व्या गायीमधी व्हती
        गाय कपीली लाडकी
मोठं गुनी जनावर
        देवगायीच्या सारकी

व्हती चरत बांदाले
        खात गवत चालली
रोप कशाचं दिसलं
        त्याले खायासाठी गेली

रोप वडाचं दिसलं
        भूत बोले त्याच्यातून
'नींघ वढाय कुठली!
        व्हय चालती आठून'

आला राग कपीलाले
        मालकाच्याकडे गेली
शींग हालवत पाडे
        माटी उखरू लागली

तिचा मालक गोसाई
        सम्दं काही उमजला
'कोन आज कपीलाले
        टोचीसनी रे बोलला?'

तसा गेला बांधावर
        रोप हालल हाललं
त्याच्यातून तेच भूत
        जसं बोललं बोललं

टाके गोसाई मंतर
        भूत पयीसनी गेलं
तसं वडाच्या रोपाचं
        तठी जैऱ्ही रोप झालं

आरे जहरी बोल्याची
        अशी लागे त्याले आंच
रोप वाढलं वाढलं
        झाड झालं जहराचं

मोठ्ठं झाड जहराचं
        गोसायाच्या शेतामधी
ढोरढाकर त्याखाले
        फिरकती ना रे कधी

काय झाडाचं या नाव?
        नही मालूम कोन्हाले
आरे कशाचं हे झाड
        पुसा गोसाई बोवाले!

>>>>>>>>>>>>

जयराम बुवाचा मान

तुझ्या लाडक्या लेकाचा
        देता मान तुले
जाऊ आता सम्दे जनं
        लोडगे खायाले

घ्यारे पुंजापत्री हाती
        उदबत्ती कापूर
वहा हात जोडीसनी
        जयराम् बोवावर

‘आज आली तुझ्या दारी
        मांगन रे तुले’
दे जयराम बुवा आता
        आऊक्ष लेकाले

आता सांगते मी ऐका
        ऐका रे काहानी
काय अवगत घडे, या
        पुन्यात्री ठिकानी

“बारा वरसाचा मुंजा
        वाटसरू कोनी
टिस लागीसनी गेला
        पेयालेज पानी”

त्याले सोंबर दीसली
        येहेर मयात

तांब्या शिकाई घेतली
        टाकली गयाद

मंग वडांग कुदीसनी
        येहरीजोय आला
तव्हा तितक्यात कोनी
        कोनी खकारला

जाये वडाच्या खालती
        कोनी आर्वालया
तढी व्हता देवध्यानी
        जयराम बोवा

म्हने जयराम बोवा
        ‘कोन तू पोरगा
अरे, पानी पेयाआंधी
        खाई घे लोडगा?’

व्हता मुंजाबी भुकेला
        बोवा पुढे आला
हाती घेतला लोडगा
        खायाले लागला

मंग खाऊन लोडगा
        वाटली हुशारी
गेला पेयासाठी पानी
        आला येहरीवरी

त्यानं सोडली शिकायी
        नित्तय पान्यात
घेये भरीसनी तांब्या
        घटाघट पेत

तव्हा पानी पेता पेता
        वडाच्या खालुन
गेला सर्पटत साप
        मुंजाच्या बाजुनं

तसा पाहे जयराम् बोवा
        डोये रोखीसन
आता लागीन लागीन
        मुंज्याले रे पान

पेत होता मुंजा पानी
        पेयात मगन
तो कशाले देइन
        आठे तठे ध्यान?

तसा उभे जयराम् बोवा
        तीराच्या सारखा
देला सापावर पाय –
        सापावर देखा

साप चेंदता चेंदता
        साप उलटला
अन् मुंजाच्या वाटचा
        बोवाले डसला

तव्हा पयाला पयाला
        मुंजा घाबरत
पडे जयराम बुवा
        लह्यन्याज देत

गेली गेली रे बातनी
        आवघ्या गावाले
आला तठे ‘हिराबाबू’
        साप उतार्‍याले

गेला जयरामबोवा मरी
        उपेग काय रे
काय चालीन मंतर
        सापाले उतारे?

अरे उलटे मंतर
        हीराबाबू वर्‍हे
गेलं चढीसनी ईख
        सोताज लहरे

झडपला ‘हीराबांबू’
        गेला रे पयत
अन् मधीच पडला
        सोंबारल्या शेतात

मौत जयराम बोवाची
        गेली नाही हाटी
लोक आले रे पाह्याले

झाली तठी दाटी

देवमानूस शेवटे
देवाघरी गेला
जिव धोक्यात घातला
मुंजा वाचवला

देलं जयराम बोवानं
जीवाचं रे दान
आता मुंजासाठी लोक
देती त्याले मान

जारे ‘बिढ्याच्या’ वरते
‘आसोद्याच्या’ वाटे
“तठी वडाच्या खालते
जयराम बोवा भेटे.”

>>>>>>>>>>>>

खोकली माय

हिवायाचं थंड वारं
        बोरी पिकल्या रानात
आली जयगावामधी
        आली खोकल्याची सात

रस्त्यांवर वावरात
        लोक खोकल्यात येडे
घरोघरी खोकलंनं
        जसे वाजती चौघडे

अरे, घेतले औसदं
        नही राहे कुठे बाकी
तरी जायेना खोकला
        सर्वे वैद्य गेले थकी

सर्वे वैद्य गेली थकी
        आता जावं कुठे तरी?
करे मनात इचार
        कोनी गावाचा कैवारी

अरें, गावाचा कैवारी
        होता मोठा हिकमती
मेहेरूनच्या रस्त्यानं
        जात व्हता कुठे शेती

“कसा आला रे खोकला
        म्हने आवंदाच्या साली”

गावाच्याच शिववर
        कोणी म्हातारी भेटली

तशी म्हातारी बोलली
        “काही धर्म वाढ बापा
इडापीडा या गावाची
        व्हई जाईन रे सपा”

तव्हा गावचा कैवारी
        काय बोले म्हातारीले
“माझ्या गावचा खोकला
        सर्वा दान केला तुले.”

ऐकीसनी म्हतारी बी
        तव्हा पडे भरमात
म्हने ‘घेनंच पडीन
        दान आलं के कर्मात!’

मंग घेतला खोकला
        सर्व गाव झाडीसनी
आन् बसे खोकलत
        सदा गया खल्ळीसनी

गेला गेला सर्वा निधी
        गावामधल्या खोकला
असा खोकल्याचा वाटा
        म्हतारीन उचलला

खोक्ला निंधीजायासाठी
        ध्रती म्हतारीचे पाय
हात जोडती रे लोक
        खोक्ली माय खोक्ली माय

मेहेरूनच्या वाटेनं
        जरा वयव रे पाय
तुले दिशीन रस्त्याले
        तठे आता खोक्ली माय!

>>>>>>>>>>>>

आप्पा महाराज

नाम जपता जपता
‘जे जे रामकृस्न हरी’
आप्पा महाराज गेले
गेले आज देवाघरी!

जसा पुत्रू ‘रामदास’
आन सून ‘सीतामाई’
तसा लोकावरी जीव
मनी दुजाभाव नही

उभ्या गावाचे कैवारी
खरे रामाचे पुजारी
आप्पा महाराज गेले –
सोडीसनी देवाघरी

आसू लोकाचे गयाले
जशा पावसाच्या सरी
आप्पा महाराज गेले
गेले आज देवाघरी

आप्पाजीची दयामाया
किती पार नाही त्याले
तुम्ही इचारा इचारा
‘बाबजीच्या समाधीले’

तुकाराम, मुक्ता जना’
मरीसनी रे जगले

आता कसं म्हनू तरी
        आप्पा महाराज मेले?

किती भजन किर्तन
        रामनामाची लहेर
केलं रामाचं मंदीर
        संत लोकाचं माहेर

राम लक्षूमन सीता
        बसवले रे मंदीरी
त्याले सोन्याचा कयस
        जागा संगमरवरी

दरसाल दहा दिसा
        येतो उच्छावाले भर
वाहनांत बशीसनी
        येती दहा अवतार

दाही सरता वहनं
        आली एकदाशी मोठी
मंग सवारला रथ
        झाली गावांमधी दाटी

चार फोडले नारय
        अरे, चाऱ्ही चाकावरी
सव्व्यां मयातले फुलं
        चढवले रथावरी

रस्त्यावर शीपडल्या
        लाखो पान्याच्या घागरी
रथ चाले घडाघडा
        लागे चाकाले मोगरी

रथ चालता चालता
        पुढे मानसाची थाप
रथावऱ्हले सारथी
        तठे दादाजी सराप

सर्व्या बजाराचे केये
        माझ्या रथाची वानगी
घरोघरी ऐपतीत
        मिये पैशाची कानगी

लोक आले दर्सनाले
        लोक झुंड्यावर झुंड्या
रथापुढती चालल्या
        किती भजनाच्या दिंड्या

ज्यांनी केली कार्तीकीले
        ‘जयगावाची’ पंढरी
आप्पा महाराज गेले
        गेले म्हनू कसं तरी?

>>>>>>>>>>>>

माझी मुक्ताई

माझी मुक्ताई मुक्ताई
        दहा वर्साचं लेकरू
चांगदेव योगीयानं
        तिले मानला रे गुरू

....

देख ग्यानियाच्या राजा
        आदिमाया पान्हावली
सव्र्याआधी रे मुक्ताई
        पान्हा पियीसनी गेली

....

अरे संन्याशाची पोरं
        कोन बोलती हिनई
टाकीदेयेल पोरांचं
        कधी तोंड पाहू नही

....

अरे असं माझं तोंड
        कसं दावू मी लोकाले
ताटीलावी ग्यानदेव
        घरामधी रे दडले!

उबगले ग्यानदेव
        घडे असंगाशी संग
कयवयली मुक्ताई
        बोले ताटीचे अभंग

घेती हिरीदाचा ठाव
        ऐका ताटीचे अभंग
एका एका अभंगात
        उभा केला पांडुरंग

गह्यरले ग्यानदेव
        डोये गेले भरीसन
असा भाग्यवंत भाऊ
        त्याची मुक्ताई बहीन!

(अपूर्ण)

>>>>>>>>>>>>

आली पंढरीची दिंडी

दारी उभे भोये जीव
        घरी पयाले पाखंडी
टायमुर्दुगाची धून
        आली पंढरीची दिंडी

पुढे लाह्याची डालकी
        बुक्कागुलालाची गिंडी
मधी चालली पालखी
        आली पंढरीची दिंडी

दोन्ही बाजू वारकरी
        मधी ‘आप्पा महाराज’
पंढरीची वारी करी –
        आली ‘जयगावी’ आज,

अरे वारकऱ्या, तुले
        नही ऊन, वारा, थंडी
झुगारत अवघ्याले
        आली पंढरीची दिंडी

टायमुर्दुगाच्यावरी
        हरीनाम एक तोंडी
‘जे जे रामकिस्न हारी’
        आली पंढरीची दिंडी

शिक्यावर बालकुस्ना
        तठी फुटली रे हांडी

दहीकाला खाईसनी
        आली पंढरीची दिंडी!

मोठ्या तट्ट्य़ाच्या दमन्या
        त्यात सर्व सामायन
रेसमाच्या कापडात
        भागवत रामायन

आले ‘आप्पा महाराज’
        चाला दर्सन घेयाले
घ्या रे हाती परसाद
        लावा बुक्का कपायाले

करा एवढं तरी ते
        दुजं काय रे संसारी
देखा घडीन तुम्हाले
        आज पंढरीची वारी

कसे बसले घरात
        असे मोडीसन मांडी
चला उचला रे पाय
        आली पंढरीची दिंडी

>>>>>>>>>>>>

स्फुट ओव्या

जसा बोल्याले कर्रय
        तसा कामाले करारी
सभावनं मन मोका
        असोद्याचा शेतकरी

कारामधी रोखठोक
        नही उसनउधारी
दोन देये दोन घेये
        असा राजा शेतकरी

असा राजा शेतकरी
        चालला रे आढवानी
देखा त्याच्या पायाखाले
        काटे गेले वाकीसनी

....

बोरू चाले कुरूकुरू
        तशा पाटया पेनशिली
पोऱ्हं निंघाले शिक्याले
        कधीमधी टांगटोली

हाया समोरची शाया
        पोऱ्ह शायीतून आले
हुंदडत हायाकडे
        ढोरं पान्यावर गेले

अरे आसोद्याची शाया
        पोऱ्हं शंबर शंबर
शायामधी भारी शाया
        तिची पह्यला नंबर!

इमानानं शिकाळती
        तठी ‘आबा’ मायबाप
देती अवघ्याले इद्या
        भरीभरीसनी माप!

....

भाऊ वाचे पोथी
        येऊ दे रे कानांवर
नको भूकू रे कुतऱ्या
        तुले काय आलं जरं!

....

कधी बाप जल्मामधी
        घडू नही ते घडलं
जसं कंगल्याचं लेकरू
        बंगल्यावऱ्हे चढलं!

....

गेला वाकडा तिकडा
        दूर सगर दिसला
जसा शेताच्या मधून

साप सर्पटत गेला!

कडू बोलता बोलता
पुढे कशी नरमली
कडू निंबोयी शेवटी
पिकीसनी गोड झाली!

....

‘फाट आता टराटर,’
नही दया तुफानाले
हाले बाभयीचं पान
बोले केयीच्या पानाले!

....

उच्च्या खुज्या जोडप्याची
कशी जमली रे जोड
उभे ताडाखाले जसं
भुईरिंगनीचं झाड!

....

हिरवे हिरवे पानं
लाल फयं जशी चोच
आलं वडाच्या झाडाले
जसं पीक पोपटाचं!

....

पयसाचे लाल फूलं
        हिर्वे पानं गेले झडी
इसरले लाल चोची
        मिठ्ठू गेले कुठे उडी?

सोमवती आमावस
        कशी आंधारली रात
देल्ही रातांध्याच्या हाती
        पेटयेल काडवात!

....

कशी दाखईन रस्ता
        आली आंधाऱ्याची रात
कसा देईन रे दान
        सांग बुझाऱ्याचा हात?

....

तुझी म्हईस ठांगय
        नको रूसू लतखोऱ्या!
माझी म्हईस दुभती
        नको हुसू रे शेजाऱ्या!

....

हिच्या तोंडात साकर
        आन पोटात निंबोनी
मोठी आली पट्टवनी

        साऱ्या मुल्खाची लभानी!

....

अरे आरदटाकेला
        तुले कशाचं हिरीत
तशी निझूर शेताले
        काय सांगे बरसात?

नांगरलं शेत
        खूप केली मशागत
पेरल्या मुकन्या
        मारे गानं गात गात!

....

फाटी गेलं पांघरून
        नको बोचकू रे चिंध्या
झालं गेलं पार पडी
        नको काढू आता गिंध्या!

....

तुले परनलं पोरी
        झाल्या जल्माच्याच भेटी
दिल्लीचं बिलबांदर
        आनी देलं तुझ्यासाठी

....

घरांमधी सर्वे गोरे
        तूच कशी कायीघूस
उज्या जवारीत आलं
        जसं कान्हीचं कनूस

....

माझं उघडे नशीब
        पीकं शेतात दाटले
तुझे जबून शेजाऱ्या
        कसे डोये रे फूटले?
रूशी बसे वर माय
        तिचा रूसवा केवढा?
"म्हणे पापड वाढला
        कसा वाकडा तिकडा?"

....

पिको आराटी बोराटी
        नको शेतामधी बांद
बरी बिरान्याची मया
        होऊ नही भाऊबंद

....

शेतकऱ्या तुझे हाडं
        शेतामधी रे मुडले
मुडीसनी झाली राख
        तापी माईत पडले

....

माझी कपीला ताऱ्हेली
    कशी पाऱ्यावर गेली
तिले गाऱ्याने गियली
    आन् पाऱ्यानेच पेल्ही

रस्त्यानं चालली
    मायबहीन आपली
मांघे फीरी पाह्यं
    पाप्प्या, धरत्री कापली

....

घाम गायता शेतात
    शेतकरी तरसला
तव्हा कुठे आभायात
    मेघूराया बरसला!

....

मेहेरूनचा तलाव
    नही लहान सहान
आज त्यानं भागवली
    जयगावाची तहान

....

अरे, वाहत वाहत
    आली नही 'मेहेरूनी'

तिले म्हणू नका लेंडी
        भागवते धोनं पानी

....

वटवट्या नारी
        तुले वटक्याची सव
तुले देल्हा जल्म
        कोन नितातेल देव?

वाटेचं वावर
        काटीकुपाटीनं बंद
निस्सवली नार
        काय करती भाऊबंद?

....

सावकारा, तुझं मन
        मन मोहरी एवढं
तुझं राकेसाचं डाच
        तुझं पोट रे केव्हढं?

देवा, घेनं जलमनं
        खुटेनाज तुझ्या दारी
तसं देनं न मरनं
        सुटेनाज संवसारी

अरे पांडुरंगा, तुझी
        कशी भक्ती करू सांग?

तुझ्या रूपाआड येतं
        सावकाराचं रे सोंग!

....

डोये लागले आभायी
        मेघा नको रे बरसू,
केली नजर खालती
        माझे शीपडले आसू

भरली येहेर
        मोट चाले भराभर
कशाले करतं
        कनाचाक कुरकुरं

....

वसांडली मोट
        करे धो धो थायन्यात
हुंदडतं पानी
        जसं तान्हं पायन्यात!

....

धर्तीवरील हिर्वय
        गेली उडत उडत
अरे उडता उडता
        झाली नियी आभायात

……………………

उठा उठा बहिनाई
बोंडं कपाशीचे येचा
बोटं हालवा हालवा
जशा पाखराच्या चोचा

……………………

जव्हा इमान सचोटी
पापामधी रे बुडले
तव्हा याच मानसानं
किल्ल्या कुलूप घडले!

किल्ल्या राह्यल्या ठिकाणी
जव्हा तिजोऱ्या फोडल्या
तव्हा याच मानसानं
बेडया लोखंडी घडल्या!

……………………

माझं दुखं, माझं दुखं
जसी आंधारली रात
माझं सुख, माझं सुख
हातातली काडवात

……………………

माझं दुखं, माझं दुखं
तयघरात कोंडले

माझं सुखं, माझं सुखं
        हांड्याझुबरं टांगले!

……………………

अरे छापीसनी आलं
        मानसाले समजलं
छपीसनी जे राह्यालं
        देयालेच उमजलं

……………………

अरे देवा तुझं देनं
        नही सरलं सरलं
देलं मोटभरी दान
        पोट भुकेलं उरलं!

अरे देवा तुझं घेनं
        काही नही, काही नही
तुझ्या पुढचा निवद
        मानुसज जातो खाई!

……………………

गानं आल कानामधी
        बुगडीले काय त्याचं?
वास गेला नाकामधी
        नथनीले काय त्याचं?

……………………

सोता झाला रे आरसा
        असा मनाचा जो साफ
तठी कशाचं रे पाप
        त्याले सात गुन्हे माफ!

....

माय म्हनता म्हनता
        होट होटालागे भिडे
आत्या म्हणता म्हणता
        केवढं अंतर पडे

....

माय म्हतली म्हतली
        जशी तोंडातली साय
बाय म्हतली बिराणी
        जशी भरडली दाय

ताता म्हनता म्हनता
        दातामधी जीभ अडे
काका म्हनता म्हनता
        कशी मांघे मांधे दडे

....

जीजी म्हनता म्हनता
        झाला जीभले निवारा
सासू म्हनता म्हनता
        गेला तोंडातून वारा!

काही व्यक्तिचित्रे

१

खटल्याच घरामधी
देखा माझी सग्गी सासू
सदा पोटामधी माया
तसे डोयामधी आसू

हिच्या अंगामधी देव
सभावानं देवगाय
माले सासरी मियाली
जशी जल्मदाती माय!

२

माझी ननद ‘कासाई’
हिचा लोभ सर्व्यावरी
रूप देवानं घडलं
जशी इंदराची परी

हिचं सरील नाजुक
चंबेलीच्या फुलावानी
देली सम्रीताच्या घरी
सोभे राजाचीच रानी!

३

माझी जेठानी ‘पानाई’
कशी मनातली गोट
हिरीतात शिरीहारी
तोंडामधी हरीपाठ

बोले तोंड भरीसंनी
        तसं हातभरी देनं
काम आंग मोडीसनी
        सैपाकात सुगडीन

भरतार देवध्यानी
        मनी दुजभाव नही
जसे वाड्यात सोभती
        पांडुरंग रूखमाई!

        ४
माझी वाहारी ‘सीताई’
        हिचं मोठं मन देखा
देल्हा देवानं सभाव
        खडीसाखरेसारखा

तसं रूपबी घडलं
        जशी बोरातली आयी
आन कामामंधी बाकी
        त्याले कुठे तोड नही

असो सासरी माहेरी
        जशी आंब्याची सावली
झिजे अवघ्याच्यासाठी
        अशी लाखात माऊली!

५

माझी सासू 'भिवराई'
कसं गमतीचं बोलनं!
हाशीसन आवघ्याचं
पोट गेलं फुटीसन

नाव ठेये आवघ्याले
करे सर्व्याची नक्कल
हासवता हासवता
शिकवते रे अक्कल!

६

पाहीसनी उंदराले
अंगामधी भरे हिव
चिमाबोय चिव चिव
आला बोक्या गेला जीव

देखीसनी बेंडकोयी
कशी झाली धावाधाव
आता डरांव डरांव
आला साप गेला जीव!

७

देखा देखा 'ठमाबाई'
मोठी बोल्याले आगीन
डोये भोकराच्यावानी
जशी पाहाते वाघीन

कव्हा हाशीखुषीमधी
        आयाबायात रमते
येता डोक्यामधी राग
        जशी चुढेल घुमते

        ८

‘भीमा’ साजरी वाहारी
        हिनं उजयलं घर
अरे वाड्यामंधी वागे
        सर्व्यांशी आदबशीर

आला मिर्गाचा पाऊस
        पडे आंगावऱ्हे ईज
पडे धर्तीवर भीमा
        लागे शेवटली नीज!

        ९

‘मांगो’ बोवाजी तुमजा
        लोभ पोरांसोरांवरी
घेता कव्हाबी उचली
        पटकन कढ्यावरी

खाद्यांवर आडी काठी
        दोन्ही हात काठीवर
वाड्यातून जाती येती
        जसे घालत पाखर

१०

‘गनपत’ ‘गनपत’
गावामधी मोतीदाना
याची जबान मोलाची
इमानाले इसरेना

खऱ्यासाठी झगड्याले
याची मोठी रे हिंमत
गनपत गनपत
सव्र्या गावामधी पत

आवघ्यालेच लह्यना
नही कोन्हाले पारखा
सग्यासायासाठी झिजे
जसा चंदनासारखा

११

‘भानादाजी’ ‘भानादाजी’
घरांमधी लिखनार
कर्तेसवरते मोठे
यांच्या हाती कारभार

अरे हाती कारभार
गोड सम्धाशी बोलनं
डोईवरती पगडी
वानीबाह्यनी चालनं

घरामधी दबदबा
तसं वागनं तोलाचं

सर्वे लोक देती मान
        कसं बोलनं मोलाचं

भाईरूनी येता घरी
        तांब्याभरी पानी पेल्हे
माझी ‘काशी’ व्हती तान्ही
        तीले घीसनी बसले

तिले ठेवलं रे खाले
        छातीमधी कय आली
अरे कोन्हा दुस्मानानं
        मूठ दाजीले मारली

१२

अरे ‘मारोत्या’ ‘मारोत्या’
        तुझ मराठं घरानं
असा कसा झाला तरी
        बाटीसनी मुसनमान

पोरासोरांमधी नाचे
        काठी फिरये गर्गर
फेके दगडाचा गोया
        फोडे कौल डोक्यावर

आला घरदार सोडी
        तुले कशाची फिकीर
तुझ्या कर्मामधी भीक
        झाला दारचा फकीर

आज मोठी एकादशी
        नको करू दारी गिल्ला!
जाय तुझ्या तक्क्यामधी
        तठी म्हन बिसमिल्ला!

१३

सदा अंगावर बुरा
        डोकं कुंभाराचा आवा
नही डोक्यात अक्कल
        पन बुचबुचु जुवा

नही कामात उरक
        खुळबुळते चेंगट
करे आदयआपट
        आलं अंगात खेंगट

कधी कोनाचं ऐकेना
        अशी आस्तुरी हाटेल
नहीं कोणाची जरब
        भरतार गह्याटेल

नही लुगड्याले पानी
        वर्स गेले निंधीसन
जशी घरांमधी नांदे
        ‘कुसुंब्याची’ घसोटीन

कोन्ही बोल्याच्याच आंधी
        करे बोंबलाबोंबल
हिले जल्म देता देवा

काय हाताले झुंबलं!

१४

‘धुडाबोय’ ‘धुडाबोय’
धुडाबोय रे केवढी
म्हनू नका रे केवढी
भूई – रिंगनी एवढी!

एका हातात काडुक
दुज्या हातात भाकर
डोक्यामधी नाकतोडे
हिच्या पायाले चक्कर

हिच्या पायाले चक्कर
तोंडामधी किरकिर
दोन्ही डोयाले झांजर
नाकामधी तपकीर

खिजवती सम्देझनं
‘धुडाबोय’ कोनी ‘धुडी’
हिच्या आवतीभंवती
पोराटोराच्या झुंबडी

हिले पाहिसन देवा
जीव पडे भरमात
कसा ‘धुडीले’ घडता
तुझा आखडला हात!

१५

आला ‘मुनीर’ टेसात
कमेटीतला शिपायी
डोये वट्टारत पाहे
रस्त्यामधली सफाई

आला मुनीर शिपयी
याची खुरटेल दाढी
याच्या हातामधी छडी
आन तोंडामधी बिडी

याची नजर चेकानी
दोन्ही बुबुयं कुखडे?
एक ‘आव्हान्याच्या’कडे
दुजा ‘कान्हाकाई’कडे!

आला मुनीर शिपायी
याची पाहीसन छडी
पोरं गडरीवरले
घरामधी गेले दडी

अशी मुनीर दादाची
सर्व्यावर दसहत
हाती घेतला झाडना
भंगी पये घाबरत!

खेकसनं दमदाटी
याचं काम जाता सरी
मंग मारतो बैठक

‘झठू’ सोनाराच्या दारी

१६

आली मुक्की पिंजारीन
आली कापूस पिंज्याले
हातामधी धुनुकनी
तोंडी वटवट चाले

हिले येयेना बोलता
काय मुक्याचं बोलनं?
समजनं समजी घ्या
जसं ताताचं वाजनं!

१७

चाले गान गात गात
‘भोजा’ फुटका फुटका
जाता येता वाड्यातून
सदा करतो वटका

मोठं बोलनं गमती
सांगे गानं गाईसन
आवघ्याले हासाळतो
याचं सुरू सदा गानं!

१८

‘छोटू भय्या’ ‘छोटू भय्या’
तुझी कानटोपी लाल
दिसे चाकीवानी तोंड
तुझे थुलथुले गाल

तुझे डोये सदा लाल
        त्याच्यातून गये पानी
तुझ्या नाकाची ठेवन
        भज्या – गुलगुल्यावानी

पोट माथनीसारखं
        वऱ्हे बोबींचे झांकन
व्होट पोपटाची चोच
        पुढे तुयशीरामायन

१९

‘लालू मिय्या’ ‘लालू मिय्या’
        गावामधी आवलिया
सदा अंगावर बुरा
        पावसायात आंघोया

दाढीमिशाचं जंगल
        अंगी फाटकी गोधडी
हाती भल्ली मोठी काठी
        पाठी चिध्याची गाठोडी

तुले नही घरदार
        सोतामधीच मगन
बारीमास भटकतो
        नही खानं नहीं पेनं!

पर्सुराम बेलदारा!

जाय आता पंढरीले
        “पर्सुराम बेलदारा”
माटीमधी टाकी पानी
        किती खुंदशी रे गारा

इटा पाडल्या पाडल्या
        पजाब बी गेला भरी
तुझ्या इटाच्या रे भट्‌टया
        किती लावशीन तरी

अरे सर्व्या जगामधी
        तूने कधी ना देखली
अशी देख एक ईट
        इठ्‌ठलाच्या पायाखाली

भट्‌टीतल्या इटांवरी
        तुझ्या संसाराचा रंग
तठी एका इटेवरी
        देख उभा पांडुरंग!

आता तरी जाय बापा
        एकदाचा पंढर्पुरा
मुखी पांडुरंगहरि
        कर नामाच्या गजरा

>>>>>>>>>>>>

धरत्रीले दंडवत

काया काया शेतांमधी
        घाम जिरव जिरव
तव्हा उगलं उगलं
        कायामधून हिरवं!

येता पीकाले बहार
        शेताशेतात हिर्वय
कसं पिकलं रे सोनं
        हिर्व्यामधून पिवंय!

अशी धरत्रीची माया
        अरे, तीले नही सीमा
दुनियाचे सर्वे पोटं
        तिच्यामधी झाले जमा

शेतांमधी भाऊराया
        आला पीक गोंजारत
हात जोडीसन केला
        धरत्रीले दंडवत

शेतामधी भाऊराया
        खाले वाकला वाकला
त्यानं आपल्या कपायी
        टिया माटीचा लावला

अशी भाग्यवंत माय
        भाऊरायाची जमीन

वाडवडीलाचं देवा,
        राखी ठेव रे वतन!

>>>>>>>>>>>>>

म्हणी

दया नही, मया नही, डोयाले पानी
गोगलगायच्या दुधाचं काढा वो लोनी

हौस केली लिसळीले गोंधलं
मोंढया बैलाले बाशिंग बांधलं

चुल्ह्याची माटी आगीन खाये
माथनीची पाटी पानी पेये

रस्त्यात पडला सोन्याचा वाया
तिकडून आला भगा आभाया

शिदोळाले आला राग
माले म्हना फन्या नाग

कुजात नारले काय सांगे माहेर
काटेसायरले केला मलमलचा आहेर!

जल्मदात्या मायजागी सावतर माय आल्य,
जशा खिरनीच्या झाडाले निंबोया आल्या

कडू खानं रूचेना, कडू बोलनं रूचे
अशी कशी दुजाभाई बोल वो वाचे

पोट म्हने भरलं पोत
जीभ म्हने तुझं काय जातं?

आरशी झाली पारखी
आता मी कोनासारखी?

केसावर रूसली फनी
एकदा तरी घाला माझी येनी

कऱ्याले गेली नवस
आज निघाली आवस

आग्या टाकीसनी चुल्हा पेटत नही
टाया पिटीसनी, देव भेटत नाही

ज्याच्या हाताले घट्टे त्याले देव भेटे

घरावऱ्हे कौल चढतं ते दिसतं
कौलावर देनं चढतं ते दिसत नही

आसू नही ती सासू कशाची?
आसरा नही तो सासरा कशाचा?

हातामधी घडाय फुकट गेला याय

पोटामधी घान, होटाले मलई
मिय्याच्या तांब्याले भाइरून कल्हई

तवा खातो भाकर, चुल्हा भुकेला
पव्हरा पेतो पानी, रहाट तान्हेला

मानसानं घडला पैसा
पैशासाठी जीव झाला कोयसा

मानूस मोठा हिमकती याचं घोंगड त्याच्यावर
दगडाचा केला देव, शेंदूराच्या जीवावर

घोड घोड म्हतलं, लढयाले जुतलं!
हातामधी फूल धरलं, ऊराशानं नाक भरलं

भयान्यानं दुकानदारी केली, तराजूवर जप्ती आली
डोईवर गुयाची भेली, वानी गल्लीत इक्याले गेली

तयापायाले भेटे धरती माई
तय हात राहाले आधारतायी

डोयाले आली आली
चस्म्याले औसदी लावली

आगीचं मडकं, बांदरानं धरलं
मरनाराचं हासू झालं

वडगन्याले ठान नही,
घरकोंबडयाले ग्यान, नही,
घरजवायाले मान नही

मस्तकातलं पुस्तकात गेलं
पुस्तकातलं मस्तकात आलं

म्हननारानं म्हन केली
जाननाराले अक्कल आली

>>>>>>>>>>>>>